**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दूरध्वनी क्र. ०२२ २२०४ ८७८९** **Email: ajay.sakhare@nic.in**

MTD-३६०३७/५२/२०२५-MTD(Desk१५) **दिनांक: २२ डिसेंबर, २०२५.**

प्रति,
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी,
पालघर.

**विषय:** पालघर जिल्ह्यातील जिल्हा मुख्यालय असलेल्या कार्यालयातील सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ पदोन्नतीची एकस्तर वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भ:**
१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएफ-२००० / प्र. क्र. ०३ / बारा, दिनांक ०६/०८/२००२.
२) आपले पत्र क्र. महसूल / लेखा / क्र. २२२ / टे-१ / कावि १०६ / २०२५, दिनांक ०२/०६/२०२५.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भाधीन क्र. २ येथील पत्रान्वये जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी अनुज्ञेय नसल्यामुळे येथे, रिक्त पदांचे प्रमाण वाढत असल्याची बाब प्रकर्षाने जाणवत असून, त्याचा प्रभाव दैनंदिन कामकाजावर देखील होत असल्याचे नमूद केले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०८/२००२ अन्वये आदिवासी क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अधिकारी / कर्मचारी यांना सवलती देण्यात आल्या आहेत. तथापि, पालघर जिल्ह्यात मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी अनुज्ञेय नसल्यामुळे विशेष कृती कार्यक्रमाचा उद्देश सफल होत नसल्याची बाब निदर्शनास येत असल्याचे नमूद केले आहे. यानुषंगाने, जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व संवर्गातील शासकीय पदधारकांना पूर्वीप्रमाणेच एकस्तर वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याबाबत विनंती केली आहे.

२. पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर ऑगस्ट-२०२१ पर्यंत पालघर जिल्ह्याचे मुख्यालय तात्पुरत्या स्वरुपात नवली येथे होते. त्यावेळी संबंधित कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय होता. माहे सप्टेंबर २०२१ पासून जिल्ह्याचे मुख्यालय

मौजे कोळगाव येथे स्थलांतर करण्यात आले आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये पालघर जिल्हा मुख्यालय मौजे कोळगावचा समाविष्ट नसल्याने, सद्यस्थितीत पालघर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीचा लाभ मिळत नाही. तथापि, पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, तलासरी व डहाणू हे तालुके पुर्णतः आणि पालघर व वसई हे तालुके अंशतः अनुसूचित क्षेत्रात येतात. जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी ७९.४७% एवढे आदिवासी उपयोजनेचे क्षेत्र असल्याचे तसेच वसई व विरार महानगरपालिका वगळता जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ६३.२६% लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे.

३. आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहनपर एकस्तर वेतनश्रेणी योजना लागू करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०६/०८/२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकत्रित आदेश निर्गमित केले आहे. या शासन निर्णयान्वये प्रोत्साहन भत्याच्या संदर्भात आदिवासी उपयोजना क्षेत्र घोषित केलेल्या ज्या गावांचा महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रामध्ये समावेश झाला असेल आणि त्या महानगरपालिका / नगरपालिका आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट नसतील तर त्या गावातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होणार नाही ही अट रद्द करण्यात आली आहे. तसेच आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट-अ ते ड मधील अधिकारी व कर्मचारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाची नजीकची वरिष्ठ / पदोन्नतीची वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. पालघर जिल्ह्याचे सुमारे ७९.४७% एवढे भौगोलिक क्षेत्र आदिवासी उपयोजना क्षेत्रात आहे. जिल्हा मुख्यालय स्तरावरील सर्व कार्यालयाचे बहुतांश कामकाज आदिवासी उपयोजना क्षेत्राशी संबंधित आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, पालघर जिल्हा मुख्यालयाच्या प्रकरणी उद्भवलेल्या विशिष्ट परिस्थितीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने एक विशेष बाब म्हणून, सदर प्रकरणाचा पुर्वोदाहरण म्हणून वापर करता येणार नाही या अटींच्या अधिन राहून, पालघर जिल्हा मुख्यालय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीचा लाभ या पत्राच्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

**आपला,**

AJAY MAHADEV SAKHARE

Digitally signed by AJAY MAHADEV SAKHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=8551bf5940f7a6d8f106f2dd0205e9978bbd325c77d8bf280667344780ebe3e8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=72E7AB3D2A7454139BED9EE5298E46008FBE5FB1F2981B96BD7E2EC94BB26F21, cn=AJAY MAHADEV SAKHARE
Date: 2025.12.22 15:14:48 +05'30'

**(अजय साखरे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत: माहितीस्त तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.**

१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

२) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर.